करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

वर्ष 34 वे

www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक डॉ.ॲड.बाबूराव हिरडे

संपादक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे

वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.४८ | पाने-१२ | दि.१३/१२/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.










# सीताफळ, पेरू पाठोपाठ केळीने दिला दणका !

## चिलींगच्या नावाखाली केळी उत्पादकाची लुट - शासनाकडून अनुदानाची मागणी

करमाळा : यावर्षी पावसाने शेतकऱ्याला साथ दिली, पण बाजारभावाने दणका दिल्याने शेतकरी पुन्हा अडचणीत आला आहे. शंभर, सव्वाशे रूपये किलो प्रमाणे जाणारे सीताफळ चक्क पंधरा ते तीस रूपये किलोने विकले जातात. ८० ते १०० रूपये किलो जाणारा पेरू चक्क २० ते ३० रूपये किलोने विकला जावू लागला आहे. आता केळीचीही तिच गत झाली असून ३० रूपये किलोने जाणारी केळी चिलींगच्या नावाखाली ९ ते १० रूपये किलोने मागितली जात आहे आणि शेतकऱ्यांना त्याच भावात केळी विकावी लागत आहे. अशा स्थितीत शासनाने केळी उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान दिले पाहिजे; अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

जळगाव पाठोपाठ केळी उत्पादनात करमाळा तालुका अग्रेसर आहे. उजनी परिसरात उत्पादीत होणारी केळी संपूर्ण तालुक्यात उत्पादीत होवू लागली आहे. केळीचे पीकही जोमदारपणे



येत आहे. अशा स्थितीत केळीला भावही चांगला मिळत आहे. गेल्या दोन महिन्याखाली ३० ते ३२ रूपये किलो जाणारी केळी गेल्या नोव्हेंबर महिन्यात २५ ते २६ रूपये किलो झाली. डिसेंबर मध्ये थंडी वाढली आणि केळीवर चिलींग आले (चिलींग म्हणजे केळीच्या वरील दोन पडद्यात जखम होणे.) दुर्दैवाने चिलींगचा माल हा निर्यात होत नाही. त्यामुळे चिलींग झालेली केळी ही देशातच पर्यायाने राज्यातच विकावी लागते. अशा स्थितीत स्थानिक व्यापाऱ्यांनी चिलींगच्या नावाखाली शेतकऱ्यांची लुट चालवली आहे. बाजारात ४० रूपये डझन विकणारी केळी शेतकऱ्याकडून ९ ते १० रूपये किलोने घेतली जात आहेत. चिलींगमुळे केळीच्या चवीवर कोणताही परिणाम होत नाही. केवळ वरील रंग पिवळा एवजी राखट रंग होतो. स्थानिक बाजारात चिलींगचा मालही त्याच दराने विकला जात आहे. असे असलेतरी शेतकऱ्याचा दर मात्र निचांकी दिला जात आहे.

तुर, मका, कांदा या पिकांना शासनाकडून हमीभाव मिळतो. त्याच धर्तीवर केळीलाही हमीभाव दिला पाहिजे. एवढेच नाहीतर ज्या शेतकऱ्यांच्या केळी पिकावर चिलींग येते अशा शेतकऱ्यास शासनाने तात्काळ अनुदान दिले पाहिजे तरच केळी उत्पादक शेतकरी जगेल. याबाबत शासनाने तात्काळ निर्णय घ्यावेत. ....**निवृत्ती सुरवसे (भोसे, केळी उत्पादक शेतकरी)**




नियोजनाशिवाय परिपुर्ण यश मिळत नाही...!

## संपादकीय..........................................!

# ‘नियोजन’ प्रत्येकासाठीच !

समाजातील चित्र नेहमीच विसंगत दिसते. काही लोक अत्यंत प्रगत दिसतात तर काहीजण सतत तोट्यात गेलेले दिसतात. काही लोक खुप कष्ट करतात पण त्यांना यश मिळत नाही. तर काही कमी कष्टात प्रचंड यश मिळवतात. असे का..? याचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे नियोजन हे आहे. जे लोक प्रत्येक दिवसाच्या प्रत्येक मिनिटाचे नियोजन करतात, ते परिपुर्ण यश मिळवतात. असे यश विद्यार्थी, व्यावसायीक, नोकरदार, शेतकरी एवढेच नव्हेतर कोणत्याही क्षेत्रात मिळू शकते.

शेतीसाठी तर नियोजनाची नितांत गरज आहे. निसर्ग लहरी आहे. कधी पाऊस पडतो तर कधी गायब होतो. यावर्षी पावसाने चांगला हात दिला पण प्रतिवर्षी पाऊस पडतो असे नाही. परवा एका वक्त्याने आपल्या भाषणात सुंदर वाक्य सांगितले. तो म्हणाला.., "निसर्ग हा आपल्या जागेवर असतो. तो आपले काम आपल्या पध्दतीने करत राहणार. आपण सावध राहिले पाहिजे व त्याद्दष्टीने नियोजन केले पाहिजे नाहीतर निसर्गाचा फटका बसतो..!"

वास्तविक पाहता दर एक-दोन वर्षाआड दुष्काळाचा फटका बसतो, हे माहित असूनही आपण शेतकरी आपल्या शेतीचे नियोजन करत नाही. पीकाचे धोरण आखत नाही आणि विक्रीचा अंदाज येत नाही. यामुळे कष्ट करूनही आपली शेती फायद्याऐवजी तोट्यात जाते. यावर्षीचे केळी पीकाचे पाहिलेतर भाव चांगला पण थंडी आली आणि केळी उत्पादकांना महासंकटात टाकून गेली. चिलींग आली म्हणून व्यापारी केळी मातीमोल भावाने मागत आहेत. ३० रूपये किलोची केळी ७ ते ८ रूपये भावाने मागत आहेत. शेतकरी सोशीक आहे, हा अन्याय सहन करतो. जर हीच केळी दोन महिने अगोदर बाजारात आली असतीतर लाखो रूपये मिळाले असते म्हणजे येथे नियोजन कमी पडते. केळीसाठी एकरी सव्वा ते दीड लाख रूपये खर्च होतो, या भावात निम्मा खर्चही मिळत नाही. तसे पहाता वरचेवर खत, पाणी, वीज याच्या किंमती वाढत आहेत आणि उत्पादन कमी व मालाचे भावही कमी होत आहेत. त्यामुळे सुध्दा शेतकरी अधिक तोट्यात जात आहे.

ज्याप्रमाणे शेतकऱ्याचे नियोजन शुन्य आहे, त्याचप्रमाणे साखर कारखानदारांचे नियोजनही अर्धवट आहे, हे यावर्षीच्या बंद साखर कारखानदारीवरून लक्षात येते. यावर्षी चारही साखर कारखाने बंद आहेत. त्याचा फटका कारखानदाराला तर आहेच पण या यंत्रणेवर अवलंबून असणाऱ्या अनेक घटकावर त्याचा परिणाम होतो. खरंतर आपल्या परिसरात चांगल्या काळात किती ऊस आहे आणि दुष्काळी स्थितीत किती ऊस मिळेल, याचा अंदाज बांधूनच कारखानदारी उभी करण्याची गरज असताना केवळ पैसा आहे म्हणून व परवाने मिळाले म्हणून चार-चार साखर कारखाने उभे राहिले आहेत. यावर्षीचे सोडा प्रत्यक्षात तालुक्यातील एकही साखर कारखाना आर्थिकदृष्ट्या सक्षम नाही. प्रत्येका समोर वेगवेगळे प्रश्न आहेत. त्यावर मात करत काही भविष्यात चालू होतील पण चालू झालेतर पुर्ण क्षमतेने चालतील की नाही ही चिंता.

कारखाना कर्मचाऱ्यांचे पगार, गुंतवलेल्या भांडवलाचे व्याज, ऊस उत्पादकांना द्यावयाचा भाव व वाहनधारकांना दिलेली उचल याचे नेमके काय करायचे ? हा एक प्रश्न अणि कारखान्याचा वाढणारा तोटा कसा भरून काढायचा ? हा दुसरा प्रश्न. या दोन प्रश्नांचा गुंता कसा सोडवायचा, हे कारखानदार मालक व संचालक मंडळास समजेनासे झाले आहे.

करमाळा तालुका हा नगर, पुणे, उस्मानाबाद, बीड व सोलापूर या पाच जिल्ह्याच्या सरहद्दीवर आहे. या तालुक्यात उजनी आणि कोळगाव प्रकल्पाचे पाणी मिळत आहे. याबरोबरच पाऊस काळ चांगला असेलतर छोटे तलाव आणि शेतकऱ्यांच्या विहिरींना पाणी राहते आणि मग शेतकरी ऊसाची लागवड करतात. चांगल्या कालावधीत सुमारे ३५ ते ४० लाख मेट्रीक टन ऊसाची उपलब्धता सहज होते. तालुक्यात सुरूवातीला आदिनाथ कारखाना त्यानंतर गरज म्हणून मकाई कारखाना सुरू झाला. त्यानंतर भैरवनाथ शुगर्स व नंतर कमलाभवानी शुगर्सची उभारणी झाली. चांगल्या स्थितीत या चारही कारखान्याच्या गळीताला धोका नाही. परंतू दुष्काळी स्थिती असेलतर व केवळ उजनी परिसरातच ऊस असेलतर तालुक्यातील कारखान्यांची स्थिती कठीण होते. साखर कारखान्यांची उभारणी चांगल्या दिवसातील ऊस पाहून झाली आहे. पण कारखाना उभारताना दुष्काळ पडलातर काय ? याचे कोणीही नियोजन केल्याचे दिसत नाही.

कोल्हापूर भागातील काही कारखान्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात स्वत:चा आणि पॅकेजमधील सभासदांचा ऊस नियोजितरितीने वाढवलेला असतो. दुष्काळ असो नाहीतर नसो त्यांचा ऊस नक्की असतो. आडसाली, पुर्व हंगामी, सुरू, खोडवा याचा ताळमेळ असतो. मुळातच कारखाना प्रतिनिधी ऊसाची लागवड करताना शेतकऱ्याच्या संपर्कात राहतात. ऊस लागवड करतानाच त्यांना ऊस तोडण्याची तारीख सांगितली जाते. तेथे ऊसतोड कार्यक्रमात कोणीही ढवळा ढवळ करत नाही. अगोदर सभासदांचा ऊस गाळप करणे व सर्व ऊसाचे गाळप झाल्यानंतर अन्य कोणाचा असेल त्याचा ऊस गाळप केला जातो. तोही ऊस साखर उतारा देणारा असेलतरच घेतला जातो. कारखान्यात साखर उतारा चांगला कसा मिळेल; याकडे या कारखानदाराचे लक्ष असते. जादा साखर उतारा मिळाला तर कारखाना खर्च, नफा भागून सभासदांना चांगला भाव मिळतो. आपल्याकडे सरासरी १० ते ११ साखर उतारा असतो. कोल्हापूर भागात १३ ते १३.५ सरासरी साखर उतारा असतो. एका टनाला त्यांना ३० ते ३५ किलो साखर जास्त मिळते. त्यामुळे सभासदाला भाव द्यायला काही अडचण पडत नाही. याशिवाय याच कारखानदारीवर पर्यायी व्यवसाय राबवले जातात. असावनी प्रकल्प, वीज प्रकल्प, कागद प्रकल्प, सोबत दुधाचे प्लॅन्ट, तांत्रीक शिक्षण संस्था, पाणी वाटप संस्था, शेतीपुरक उद्योग खत व पशुखाद्य निर्मितीचे उद्योग आहेत. त्यामुळे कामगारांना सतत काम मिळते. मालाला ग्राहक मिळतो व ग्राहकाला स्वस्त दारात माल मिळतो. दुष्काळ असो नाहीतर सुकाळ असो, तेथे पाण्याची चैन केली जात नाही. मोठ मोठे तलाव व ठिबक शेती हे दोन पर्याय त्यांनी ठेवले आहेत. वर्ष-दोन वर्षे पाऊस पडला नाहीतरी तेथील शेतकरी घाबरत नाही व कारखानदारही चिंता करत नाहीत. तेथे नियोजन असते.

पण आपल्याकडे फक्त साखर काढणे हा एकमेव उद्योग आहे. साखर कारखान्यात ऊस विकास व ऊस पुरवठा हे दोन विभाग असतात. त्यातील ऊस विकास हा विभाग क्रियाशुन्य राहतो. दोन्ही विभाग फक्त ऊस पुरवठ्याचेच काम करतात. ऊस असेलतर ठिक. दुष्काळ पडला की ऊसाअभावी कारखाने बंद. पाऊस पडला नाहीतर शेती बंद. शेतकऱ्यांनी कधी नियोजन केले आहे का.., पाऊस जरी पडला नाहीतरी आपला दोन एकर ऊस ठिबकवर जगवू शकतो. अथवा दुसरे पर्याय देवून म्हणजे शेततळी बांधून अथवा बाहेरून पाणी आणून जगवू शकतो, असे नियोजन नाही. आपण एकदम आठ-दहा एकर ऊस लावतो आणि पाऊस नसला की सर्वच ऊस जाळून बसतो. वास्तविक पाहता प्रत्येक बाबीचे नियोजन केले पाहिजे. ऊस नसेलतर दुसरे कोणते पीक घेता येईल का..? याचा विचार झाला पाहिजे. इस्त्राईलसारख्या देशात आपल्याकडे दुष्काळात जेवढा पाऊस पडतो त्यापेक्षा कमी पाऊस पडूनही ते जास्तीत जास्त उत्पादन घेतात, ते कसे ..? याचा कधीतरी आपण सर्वांनी विचार करायला हवा.

साखर कारखानदार आपल्या जवळचे भांडवल गुंतवून कारखाना उभा करतात, पण तो परावलंबी पध्दतीने चालवतात. जेंव्हा कोणताही उद्योग दुसऱ्यावर अवलंबून असतो, तेंव्हा त्या उद्योगाचे काहीच खरे नसते. त्यामुळे तर पूर्वी शेती महामंडळ उभे केले होते. तेथे शेकडो एकर शेती संपादीत केली होती व त्यावर ऊस लावून तेथे साखर कारखाने उभारले होते. नगर जिल्ह्यातील बेलवंडी व बेलापूर हे दोन कारखाने त्याची उदाहरणे आहेत. आता शेती महामंडळ मोडीत निघाले, त्यांचे कारखानेही कवडी मोलाने विकले असो.. यापुढे तरी सर्वच व्यावसायिकांनी विशेषत: शेतकऱ्यांनीही शेतीचे योग्य नियोजन केले पाहिजे. अन्यथा यापुढे तीन वर्षे चांगले जातील, एक वर्ष खराब जाईल व सर्व मेहनत त्यात मातीत जाईल हे विसरून चालणार नाही. त्यामुळे नियोजनाला किती महत्व असते हे लक्षात घेतले पाहिजे. नियोजन सुर्योदयापासून सुर्यास्तापर्यंत केले तर वेळ वाचेल आणि ती वेळच भविष्य घडवेल हे सुध्दा लक्षात घेतले पाहिजे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# क.न.प. निवडणूक भाजपा स्वतंत्र लढविणार : जगदीश आगरवाल



करमाळा(सं.प्र.) : आगामी करमाळा नगरपरिषदेची निवडणूक भारतीय जनता पार्टी स्वतंत्र लढविणार असल्याची माहिती भाजपाचे तिसऱ्यांदा शहराध्यक्ष निवडलेले जगदीश आगरवाल यांनी दिली.

जगदीश आगरवाल यांना भाजपाच्या वरीष्ठ पातळीवरून पुन्हा सक्रिय होण्याचे आदेश देवून पहिल्या पदावरच कायम करण्याचे आदेश दिले आहेत. त्या पार्श्वभुमीवर ते सा.संदेशशी बोलत होते. पुढे बोलताना श्री.आगरवाल म्हणाले, की करमाळा नगरपरिषदेची लवकरच निवडणूक होत आहे. ही निवडणूक भारतीय जनता पार्टी स्वतंत्र व पूर्ण ताकदीनिशी लढवेल. सत्ताधाऱ्यांनी नगरपालिकेची एवढे वर्षे सत्ता भोगून शहराचा विकास होण्याऐवजी भकास झाला आहे. सर्वत्र शहरात रस्ते, गटारी, स्वच्छता, पाणी या बाबींचा बोजवारा उडशला असून नागरीक हैराण झाले आहेत. कमीशनखोरीमुळे शहरतील विकासकामाची वाट लागली आहे. त्यामुळे शहराच्या विकासासाठी आता करमाळा नगरपरिषदेमध्ये परिवर्तन होणे ही काळाची गरज आहे. केंद्र व राज्यात भाजपाची सत्ता असल्याने करमाळा नगरपालिकेत भाजपाची सत्ता आली तर शहरासाठी भरीव निधी आणता येईल. त्यासाठी जनतेने भाजपाच्या पाठीशी राहणे गरजेचे आहे.

करमाळा शहराला नवीन पाणी योजना, भुयारी गटार योजना, शहरांतर्गत रस्ते, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, टाऊन हॉल, न.पा.कार्यालय इमारत, उद्यान आदी विकासाची कामे मार्गी लागतील. त्यादृष्टीने नागरीकांनी जागृत होण्याची गरज आहे. कोणत्याही अभिषाला व पावणेरावळ्यांच्या संबंधाला मतदारांनी बळी पडू नये; असेही आवाहन जगदीश आगरवाल यांनी केले आहे.

### इच्छुकांच्या भ्रमाचा भोपळा फुटला

करमाळा भाजपा शहराध्यक्ष पदासाठी काही मंडळी इच्छुक होती. त्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. पद मिळेल या भ्रमात काहीजण होते. पण त्यांचा भ्रमाचा भोपळा फुटला आहे. आम्ही पिढ्यान पिढ्या पक्षासाठी वाहून घेतले आहे. पद असो नसो.. आम्ही पक्षासाठी कायम निष्ठेने काम करणारी माणसं आहोत.

**...जगदीश आगरवाल** (शहराध्यक्ष, भाजपा)

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



# जय बजरंगबली
## टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

**• नेपाळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी)
वाराणसी, गोरखपूर, प्रयागराज, काठमांडू, मनोकामना, लुंबिनी, अयोध्या, पोखरा

**• काशी दर्शन**
काशी, गया, आयोध्या, प्रयाग

**• गुजरात दर्शन**
गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम, अक्षरधाम, स्टेचु ऑफ युनिटी, सरदार वल्लभभाई पटेल पुतळा
कालावधी : दि.३/१/२०२५ ते ११/१/२०२५
सहल खर्च : रू.१४,०००

**• कन्याकुमारी दर्शन**
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
कालावधी : दि.१६/१/२०२५ ते २६/१/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

**• गंगासागर दर्शन**
गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
कालावधी : दि.३०/१/२०२५ ते ७/२/२०२५
सहल खर्च : रू.१२,८००

**• केरळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी)
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, मधुराई, रामेश्वरम्
कालावधी : दि.११/२/२०२५ ते २३/२/२०२५
सहल खर्च : रू.३१,५००

**• वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन**
माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
सहल खर्च रू.२६,०००
कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५

**• वैष्णोदेवी दर्शन**
माता वैष्णोदेवी, शिवखोरी, जम्मू अमृतसर, अटारी बॉर्डर, दिल्ली
कालावधी : दि.९/३/२०२५ ते १७/३/२०२५
सहल खर्च : रू.१३,८००

**• मथुरा दर्शन**
मथुरा, आग्रा, गोकुळ, वृंदावन, बरसाना, गोवर्धन पर्वत, नंदगाव
कालावधी : दि.२२/३/२०२५ ते २८/३/२०२५
सहल खर्च : रू.९,१००

• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय





संपर्क **श्री.मयुर राऊत**
**बुकींग सुरू**
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
**फ्रेश मटेरियलची हमी** फक्त **एव्हरफ्रेश सुपरमार्ट** मध्येच !

**सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर भरघोस डिस्काउंट**

रोगप्रतिकारक क्षमता, मेंदूची स्मरणशक्ती वाढविण्यासाठी आणि निरोगी बनण्यासाठी उपयुक्त असलेले उच्चप्रतीचे



# ड्रायफ्रुट्स



**हेल्दी ड्रायफ्रुट्स व सीड्स फ्रेश स्टॉक उपलब्ध !**

- काजू । बदाम । मनुके
- पिस्ता । चारोळी । केशर
- मामरा बदाम । अंजीर अक्रोड
- आख्खा अक्रोड । लाल खजूर
- काळी खजूर । सिडलेस खजूर
- कलमी खजूर । आजवा खजूर
- आवळा कॅन्डी । काळे मनुके
- मिक्स ड्रायफ्रूट । मोरावळा
- मखाना । फ्लेवर मखाना
- खारीक । काळी खारीक
- खोबरे । डिंक । धावड्या डिंक
- गावरान गाई व म्हशीचे तूप
- पिवळी व काळी खारीक पावडर
- जर्दाळू । बदाम व पिस्ता स्लाईस
- खारा पिस्ता । खारा बदाम
- खारा काजू । मसाला काजू
- ड्राय किवी । मिक्स ड्राईड फ्रुट्स
- ड्राय मोसंबी । ड्राय पायनापल
- ड्राय स्ट्रॉबेरी । ड्राय मँगो
- ड्राय ब्ल्यूबेरी । ड्राय रासबेरी
- पमकीन सीड्स । रोस्टेड मिक्स सीड्स

*टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !

॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
# एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥

*नियम व अटी लागू

किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुट्स् । बिस्किटस् । नमकीन अॅन्ड स्वीटस् । बेकरी अॅन्ड मिल्क प्र' नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अॅन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

प्रियंका
आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ञ ऑपरेशन थिएटर ● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

## माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे वाढदिवसानिमित्त

# रावगाव येथे मोफत आरोग्य शिबीर संपन्न



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका माध्यमिक शिक्षक सोसायटीचे माजी संचालक तथा रावगाव ग्रामपंचायतीचे सदस्य भाऊसाहेब बुधवंत यांचे संकल्पनेतून माजी आमदार जयवंतराव जगताप यांचे वाढदिवसानिमित्त भव्य मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. या शिबीरात ३०० नागरीकांची आरोग्य तपासणी करण्यात आले.

या शिबीराचे उद्घाटन कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक तथा माजी सरपंच दादासाहेब जाधव, भाऊसाहेब बुधवंत, माजी सरपंच विलास बरडे, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर जाधव, ग्रा.पं.सदस्य दादा पवार, सुहास जवंजाळ, दादा कांबळे, भास्कर पवार, सुनिल जाधव, अनिल काळुंखे, भाऊसाहेब फुंदे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. या शिबीरात साडे आरोग्य उपकेंद्राचे वैद्यकिय अधिकारी डॉ.पुंडे, बार्शीचे मुळव्या तज्ञ डॉ.नागरगोजे, अस्थिरोग तज्ञ डॉ.नितीन निंबाळकर, डॉ.अपेक्षा शिंदे, डॉ.डोळस, पुणे येथील डॉ.एच.व्ही.देसाई हॉस्पिटलचे कर्मचारी, आरोग्य कर्मचारी सुदर्शन केकान, बंडगर, पठाण आदी तज्ञ डॉक्टर व त्यांच्या टीमने रूग्णांची तपासणी केली. यात रक्तदाब, शुगर, रक्त तपासणी, मुळव्याध तपासणी, गुडघे व मणका दुखी, साथीचे आजार आदींवर मोफत उपचार करण्यात आले. सर्वसामान्य नागरीकांसाठी हा उपक्रम राबविण्यात आल्याने या समाजपयोगी उपक्रमाचे कौतूक ग्रामस्थांनी केले.

सस्नेह निमंत्रण
॥ श्री गणेशाय नमः ॥
सस्नेह नमस्कार वि.वि. आमचे येथे श्रीहरी कृपेकरून
चि.विनायक B.E.Mech.
कै.गणपत निवृत्ती पाखरे यांचे नातू व
श्री.दत्तात्रय गणपत पाखरे रा.उमरड, ता.करमाळा यांचे चिरंजीव
चि.सौ.कां.पुजा B.com
कै.लक्ष्मीकांत बबन शिंदे रा.श्रीगोंदा, जि.अ.नगर यांची कन्या
यांचा शुभविवाह
मंगळवार, दि.२४/१२/२०२४ रोजी
सायं. ५ वा. ५१ मि.
संपन्न होणार आहे. तरी याप्रसंगी सहकुटूंब, सहपरिवार आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे..!
आपले नम्र
श्री.दत्तात्रय गणपत पाखरे (पत्रकार)
श्री.तानाजी गणपत पाखरे (ग्रामविकास अधिकारी)
समस्त पाखरे परिवार, उमरड
विवाहस्थळ
धर्मसंगीत मंगल कार्यालय
करमाळा-कर्जत रोड
करमाळा, जि.सोलापूर
टीप : सर्वांना निमंत्रण पत्रिका दिलेल्या आहेतच. नजरचुकीने कोणास निमंत्रण पत्रिका मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून शुभकार्यास अगत्य येण्याचे करावे, ही नम्र विनंती !

महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय ?
बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामूक्त व्हा...
आता जून्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी ३ चाकी ४ चाकी ट्रक ट्रॅक्टर JCB पोक्लेन सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
● बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
● प्लंबींग ● हार्डवेअर
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ताः बायपास रोड, जेऊर.

# देवळालीचे माजी सरपंच गायकवाड यांचे सदस्यपद रद्द

करमाळा(सं.प्र.) : देवळाली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच आशिष गायकवाड यांचे सदस्य पद उपजिल्हाधिकारी यांनी रद्दबातल ठरवले आहे. शासकीय इमारतीवर अतिक्रमण केल्याचा ठपका त्यांचेवर ठेवण्यात आला आहे.


देवळाली ग्रामपंचायतीची मुदत २०२१ ते २०२५ अशी असून आशिष गायकवाड यांनी यापूर्वी सरपंच पद भुषवले होते. देवळाली येथील सुधीर विलास आवटे यांनी सोलापूर जिल्हाधिकारी यांचेकडे गायकवाड परिवाराने शासकीय अंगणवाडी इमारतीवर बेकायदेशीर अतिक्रमण करून शासकीय स्वस्त धान्य दुकान थाटले असल्याची लेखी तक्रार केली होती. तसेच गायकवाड यांना पदावरून बडतर्फ करावे; अशी देखील मागणी त्यांनी केली होती. आवटे यांच्या तक्रारीनंतर ग्रामसेवक व पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांनी गावातील पंचांच्या उपस्थितीत या अतिक्रमीत जागेची पाहणी करून अहवाल सादर केला. या अहवालावरून अतिक्रमण केल्याचे समोर आले. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी माजी सरपंच व विद्यमान सदस्य आशिष गायकवाड यांना पुरावे देण्याबाबत व म्हणणे मांडण्यासाठी संधी दिली. मात्र त्यांना पुरावे देता आले नाहीत. त्यामुळे उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४ (ज ३) व १६ प्रमाणे उत्तरवादींना ग्रामपंचायत सदस्य राहण्यास अपात्र ठरवून त्यांची निवड रद्द केली.

१० डिसेंबर रोजी हा निर्णय दिला. सुधीर आवटे यांचे वतीने ॲड.लक्ष्मीकांत गवई यांनी बाजू मांडली.

> गायकवाड यांनी सदस्य पदाचा पदभार घेतल्यानंतर मी सदर शासकीय जागेवर असलेले अतिक्रमण खाली करावे व चिमुकल्यांची जागा त्यांना द्यावी; अशी सतत सहा महिने वारंवार कल्पना आशिष गायकवाड यांना केली होती. परंतु ती बाब त्यांनी गंभीरतेने घेतली नाही आणि सदरचे अतिक्रमण काढून टाकले तर नाहीच पण उलट भाषा वापरली गेली म्हणून मी रितसर जिल्हाधिकारी यांचेकडे गायकवाड यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. सदर तक्रारीचा निकाल तक्रार दाखल केल्या-पासून सहा महिन्याच्या आत मिळून त्यांचे सदस्य पद रद्द होणे अपेक्षित होते. परंतु केवळ आणि केवळ माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या वरदहस्तामुळे सदर केसचा निकाल लागण्याकरीता चार वर्षांचा कालावधी लागला.
>
> **...सुधीर आवटे (देवळाली तक्रारदार)**

**खुशखबर** मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात **खुशखबर**

**डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध**



बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
**डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)**



**उपलब्ध सुविधा...**
● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

**ओपीडी /ऑपरेशन ठिकाण**
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
**लोकरे हॉस्पिटल**
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)

**परिचय**
**डॉ.विकास देविदास नागरगोजे**
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



**ओपीडीचे वैशिष्ट्ये...**
● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा
● प्रभावी औषधी सुविधा ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● पार्किंगची व्यवस्था
● आठवड्यातून दोनदा ओपीडी

**विशेष सुचना...** १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजारायी फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

**नाव नोंदणीसाठी संपर्क**
मो.9763035862

**बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल** कोर्ट समोर, बार्शी.

## राजे रावरंभा शेतकरी प्रोड्युसर कंपनीच्या

# सभासदांना ठिबक खरेदीवर ५ हजार रू. अनुदान



करमाळा (सं.प्र.) : केंद्र सरकारच्या १० हजार शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्याच्या धोरणा अंतर्गत करमाळा तालुक्यामध्ये राजे रावरंभा शेतकरी प्रोड्युसर कंपनीची स्थापना झालेली असून नाबार्डच्या अर्थसहाय्यातून या कंपनीची यशस्वी वाटचाल सुरू आहे. अवघ्या दोन वर्षाच्या कालावधी मध्ये कंपनीने २ कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल केलेली आहे. वॉटर शेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या प्रयत्नांमधून व वॉलमार्ट फाउंडेशनच्या निधीमधून कंपनीच्या सभासदांसाठी प्रो राईस हा संयुक्त भागीदारी प्रकल्प तालुक्यामध्ये राबविला जात आहे. या प्रकल्पांतर्गत विषमुक्त भाजीपाला व शेती करण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. याच प्रकल्पामधून कंपनीच्या सभासदांनी पाणी बचतीचे तंत्र आत्मसात करावे; यासाठी प्रोत्साहन पर ५ हजार रूपये अनुदान जाहीर करण्यात आले आहे; अशी माहिती अध्यक्ष डॉ.विकास वीर यांनी दिली.

ठिबक सिंचन किंवा स्प्रिंकलर खरेदी केल्यास सभासदांना शासकीय अनुदाना व्यतिरिक्त थेट ५ हजार रूपयांचे अनुदान दिले जाणार आहे. कंपनीच्या एका सभासदाला एक एकरसाठी ५ हजार रू. अनुदान असणार आहे. एकापेक्षा जास्त एकर साठी ठिबकाची खरेदी केली तरी अनुदान एकच एकराचे दिले जाणार आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या अनुदानाचा लाभ घ्यावा; असेही आवाहन डॉ.विकास वीर यांनी केले आहे.

सध्या कंपनीचे जे सभासद आहेत ते या अनुदानाचा लाभ घेऊ शकतात. या व्यतिरिक्त कंपनीने दुसऱ्या टप्प्यातील शेअर्स विक्री सुरू केली असून जे सभासद नव्याने शेअर्स घेतील त्यांना सुध्दा या अनुदान योजनेचा लाभ घेता येणार आहे. यासाठी ठिबक हे जैन कंपनीचे आयएसआय मार्क असलेलेच ठिबक सभासदांनी खरेदी करणे बंधनकारक असणार आहे. कंपनीचे महिला सभासद कमी असल्यामुळे दुसऱ्या टप्प्यांमध्ये नाबार्डच्या धोरणानुसार महिला सभासदांसाठी फक्त २१०० रू. हे सभासद मुल्य ठेवले त्याचा फायदा महिला शेतकऱ्यांनी घ्यावा; असेही आवाहन डॉ.वीर यांनी केले आहे.




आपल्या लाडक्या
**मुला-मुलींच्या वाढदिवसानिमित्त**
**आकर्षक रिमोट कंट्रोल इलेक्ट्रीक थार (जीप) भेट द्या !**
आजच आपली गाडी बुकींग करून डिस्काउंटचा लाभ घ्या !

**पत्ता : श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.**
**(9822058106, 7798307085)**



**साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज**

सर्व प्रकारचे
स्टील रेलींग, मेनगेट
किचन ट्रॉलीची सर्व कामे
खात्रीशीर व वेळेवर
करून मिळतील.





प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.


मा.श्री.
देवेंद्रजी फडणवीस साहेब
यांची
महाराष्ट्र राज्य
मुख्यमंत्री
पदी निवड झाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन
मा.श्री.गणेश(भाऊ) चिवटे
(जिल्हा सरचिटणीस, भाजपा)
मा.श्री.राम(भाऊ) ढाणे
(ता.अध्यक्ष, भाजपा)
मा.श्री.अफसर(तात्या) जाधव
(जिल्हा उपाध्यक्ष, भाजपा)
मा.श्री.काकासाहेब सरडे
(ता.सरचिटणीस, भाजपा)
मा.श्री.अमोल पवार
(ता.अध्यक्ष, भाजपा युवा मोर्चा)
शुभेच्छुक भारतीय जनता पार्टी, करमाळा
मा.श्री.जगदीश आगरवाल
(शहराध्यक्ष, भाजपा)


Shweta
Gift & Toys
श्वेता गिफ्ट ॲन्ड टाईज
लहान मुला-मुलींसाठी
सर्व प्रकारच्या
खेळणी व भेटवस्तू
उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 )


श्री कमलादेवी ध्वजाचे सेवेकरी व
जि.प.प्रा.शाळा जातेगावचे
केंद्रीय माजी मुख्याध्यापक
श्री.बाबू गंगाधर डबडे
75
अमृतमहोत्सवी वाढदिवस
15 डिसेंबर
दि.१५/१२/२०२४ रोजी ७५ व्या वर्षात प्रवेश करीत आहेत. त्यांना उदंड आयुष्य लाभो, हीच कमलाभवानी चरणी प्रार्थना..!
अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
• पत्नी - नलिनी बाबू डबडे(पत्नी)
• मुलगा - सचिन बाबू डबडे सर • सुन - सौ.गीतांजली सचिन डबडे (शिक्षिका)
• मुलगा - प्रविण बाबू डबडे (मुलगा) (M.A. Agri.), • जावई - अनंतराव प्रकाश आंब्रुळे सर
• मुलगी - सौ.प्रज्ञा अनंतराव आंब्रुळे (मुलगी) (M.A.D.ed) समस्त डबडे परिवार, श्रीदेवीचामाळ

# ॥ प्रथम पुण्यस्मरण ॥



अत्यंत कठीण त्याग व अपार परिश्रम घेऊन
चंदनासारखा देह झिजवून
आम्हांस घडविले.., वाढविले..,
जनसामान्यात आमचे व कुटूंबाचे
वैभव निर्माण केले.
आपल्या मायेचे गुणवर्णन करण्यास
शब्द अपुरे आहेत.
आपली ज्योत अनंतात विलीन झाली,
स्मृती आठवणींनी दाटून आली
भावसुमनांची ओंजळ भरूनी वाहतो आम्ही...

**॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥**

आमचे पिताश्री

## कै.रविंद्र भानुदास क्षीरसागर

यांचे **'प्रथम वर्षश्राध्द'** सोमवार दि.१६/१२/२०२४ रोजी दुपारी १२.३० वा करण्याचे योजिले आहे. तरी याप्रसंगी पुष्पांजली वाहण्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

• टीप •
प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त
ह.भ.प.अॅड.डॉ.बाबुराव हिरडे महाराज
यांचे सकाळी १० वा.
सुश्राव्य हरिकिर्तन, पुष्पांजली
व नंतर महाप्रसाद होईल.

आपले नम्र **गणेश रविंद्र क्षीरसागर, नागेश रविंद्र क्षीरसागर व समस्त क्षीरसागर परिवार**

**स्थळ : छत्रपती चौक, श्री कमलादेवी मशिनरी दुकानच्या वरती, करमाळा.**

# ॥ द्वितीय पुण्यस्मरण ॥

'मातृ देवो भव'



**कै.सौ.वैजयंतीमाला मिश्रीलाल अब्बड(मम्मी)**
(जन्म दि.६/१२/१९५९, मृत्यू दि.१७/१२/२०२२)

आई.. वात्सल्याची तू मूर्ती
समाजसेवा, गोरगरीबांच्या हक्कासाठी व गावाच्या उन्नतीसाठी
तुझ्या कष्टांची आणि त्यागाची गाथा आहे
तुझ्या मार्गदर्शनाने, आम्हाला दिशा मिळाली
तुझ्या शिकवणीतून जीवन अर्थपूर्ण बनले
ऋण तुझे अनेक.., आई शब्दातच सामावेले जग सारे
लाभू दे पुण्याई अशी की, सारे जन्म तुझ्याच उदरात मिळो !

दि.१७ डिसेंबर रोजी असलेल्या द्वितीय पुण्यस्मरण दिनानिमित्त

**तुझ्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !**

**अभिवादक : मिश्रीलाल भागचंद अब्बड (मो.९९६०७१७१७७)**

**तुझी.. मुले, सुना, जावई आणि नातवंड**

# सस्नेह निमंत्रण

**डॉ.ओंकार विलास शिराळ (B.D.S.)**
यांचा


# अनुजा

## दातांचा दवाखाना

## भव्य शुभारंभ

रविवार दि.२२/१२/२०२४ रोजी होणार आहे.
तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.
(सकाळी १० वाजलेपासून आपले आगमना पर्यंत)

• आपले विनीत •
**डॉ.ओंकार विलास शिराळ, श्री.विलास शिराळ सर**



**कृष्णाजीनगर, कमलादेवी रोड, LIC ऑफिस शेजारी, बायपास चौक, करमाळा.**

# उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेमुळे तालुक्याच्या विकासात भर : अ‍ॅड.वीर



करमाळा(सं.प्र.): संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अडीच वर्षाच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात जवळपास २० कोटी रूपयांचा विकास निधी करमाळ्यात आला असून गेली २५ वर्षापासून प्रलंबित असलेला करमाळा एमआयडीसीचा प्रश्न मार्गी लागला आहे. आता लवकरच नव तरूणांसाठी उद्योगासाठी एमआयडीसी प्लॉट उपलब्ध होतील; असे प्रतिपादन माजी उपनगराध्यक्ष अ‍ॅड.कमलाकर वीर यांनी केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विशेष निधीतून करमाळा शहरात आधुनिक व्यायाम शाळेसाठी ४४ लाख रूपये निधी मंजूर झाला असून या इमारतीचे भुमीपूजन अ‍ॅड.वीर यांचे हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, तालुका प्रमुख अनिल पाटील, उपतालुका प्रमुख डॉ.गौतम रोहे, बाळासाहेब वाघ, शहरप्रमुख संजय शिलवंत, माजी तालुकाप्रमुख राहुल कानगुडे, युवा सेना उपजिल्हा प्रमुख चंद्रकांत राखुंडे, वैद्यकिय मदत कक्ष प्रमुख नागेश चेंडगे, महिला आघाडी शहरप्रमुख किर्ती स्वामी, भाजपा शहरप्रमुख जगदीश आगरवाल, ठेकेदार विश्वास काळे-पाटील, सचिन गांधी, भरतशेठ कांबळे, प्रविण गायकवाड, विकास ढाळे, रंभापुरा शाखाप्रमुख निलेश चव्हाण, बाबा तोरे, जेऊर शाखाप्रमुख संजय जगताप आदीजण उपस्थित होते.

पुढे बोलताना अ‍ॅड.वीर म्हणाले, की मंगेश चिवटे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या माध्यमातून वैद्यकिय निधी मधून तालुक्यातील अनेक रूग्णांना मदत झाली.

यावेळी जिल्हाप्रमुख महेश चिवटे म्हणाले, की जेऊर व करमाळा बसस्थानक या दोन्ही बसस्थानकाला निधी मंजूर झाला आहे. तसेच विद्यार्थीनींसाठी धर्मवीर आनंद दिघे अभ्यासिका मंजूर झाली असून यातून स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळणार आहे. या इमारतीसाठी ४५ लाख रूपये मंजूर झाले आहेत. तसेच मांगी रोडवरील शासकीय एमआयडीसी मध्ये उद्योजकांना तात्पुरता पाणीपुरवठा करण्यासाठी साडेचार कोटी रूपयांची योजना मंजूर झाली असून येत्या आठवड्यात त्याचे भुमीपूजन होणार आहे. पाच-पाच गुंठेचे ९० प्लॉट उद्योजकांना वाटपाची प्रक्रिया सुरू करणार असल्याची माहिती चिवटे यांनी दिली.

# चंद्रभागा शिंदे यांना मेंदूवरील उपचारासाठी एक लाखाची मदत

करमाळा (सं.प्र.) : शाहुनगर येथील रहिवाशी असलेल्या चंद्रभागा मगन शिंदे यांना मेंदूवरील शस्त्रक्रिया करण्यासाठी पॅसिफिक हॉस्पिटल अहमदनगर येथे अ‍ॅडमीट करण्यात आले होते. उपचारासाठी लाखो रूपयांचा खर्च होता. यावेळी त्यांनी करमाळा शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाशी संपर्क साधला असता, वैद्यकिय मदत कक्षाचे समन्वयक नागेश चेंडगे यांनी मदत कक्षाकडे आर्थिक मदतीसाठी अर्ज केला, त्यानंतर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी पाठपुरावा शिंदे यांना उपचारासाठी वैद्यकिय मदत कक्षाकडून एक लाखाचा मदत निधी मिळवून दिला. याकामी मुख्यमंत्री वैद्यकिय मदत कक्षाचे माजी कक्षप्रमुख मंगेश चिवटे यांचे सहकार्य लाभले.

मेंदूवरील उपचारासाठी माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वतीने एक लाख रूपये मदत निधी मिळाल्याने खऱ्या अर्थाने एकनाथ शिंदे हे सर्वसामान्य गोरगरीब रूग्णांचे आधार असून त्यांचे आम्ही ऋणी आहोत; असे मत चंद्रभागा शिंदे यांचे नातेवाईकांनी व्यक्त केले.

करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी
सोलापूर येथील त्वचारोग तज्ञ
डॉ.संकेत मंडलेचा MBBS, DDV (Pune)
प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत




त्वचा विकार : नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स्, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, अ‍ॅलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या,नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला
संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर
अपॉईंटमेंट : मो.9423333904

## १८० कोटी खर्चून केलेल्या महामार्गावर पडत आहेत खड्डे

# मुरूमाने खड्डे बुजवून बांधकाम विभागाचा प्रताप



करमाळा(सं.प्र.): कोर्टी ते आवाटी राज्य महामार्ग क्र.६८ या १८० कोटी रूपये खर्चून तयार केलेल्या महामार्गावर वर्षभरात भले मोठे खड्डे पडायला सुरूवात झाली. महामार्ग असल्याने अचानक खड्डा आल्यानंतर वेगात असलेली वाहणे खड्ड्यात आदळून मोठे नुकसान होत आहे तर खड्डा चुकवण्याच्या नादात या रस्त्यावर अनेकवेळा अपघात देखील घडले आहेत.

पांडे येथील वळणांवर पडलेल्या खड्ड्याचा अंदाज न आल्याने स्थानिक पत्रकार अविनाश जोशी यांच्या पत्नी मंजिरी जोशी या मोटारसायकलवरून पडून गंभीर जखमी झाल्या आहेत. असे अपघात अनेकवेळा घडलेले आहेत. परंतु या घटनेकडे बांधकाम विभाग तसेच संबंधित एन.पी. कन्स्ट्रक्शन कंपनीकडून डोळेझाक होत आहे. मुरूमाने खड्डे बुजवण्याचा प्रताप बांधकाम विभागाकडून करण्यात आला आहे. वाहणे जावून हा मुरूम पुन्हा रस्त्यावर उडून येत असल्याने धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी चढउतार झाल्याने वेगात असलेल्या वाहनांचा ताबा सुटत असल्याने अनेक चारचाकी वाहने पलटी होवून अनेकांना जीव गमवावा लागला आहे तर अनेकांना अपंगत्व आले आहे. तरी याबाबीकडे शासनाने लक्ष देवून संबंधित ठेकेदारावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा; अशी मागणी नागरीकातून व्यक्त केली जात आहे.

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड अ‍ॅन्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन फ्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

बैंक ऑफ़ इंडिया
Bank of India
ग्राहक सेवा केंद्र
संपर्क : शशिकांत शेखर स्वामी
मो.7350429699
सुविधा...
■ पैसे भरणे व काढणे.
■ सेव्हिंग खाते उघडणे.
■ बँकेच्या इतर खात्यातून रोख रक्कम काढणे
■ प्रधानमंत्री विमा योजना व अटल पेन्शन योजना करविणे.
पत्ता : श्रीराम मंदिर समोर, वीर चौक, वेताळपेठ, करमाळा.

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह
डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O) | डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)
उपलब्ध सुविधा.. • गरोदर माता तपासणी व उपचार • सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर • नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे • मासिक पाळीचे आजार निदान व उपचार • वंध्यत्व निवारण • सिझेरियन प्रसुती • गर्भशयाचे आजार निदान व उपचार • मेनोपॉज क्लिनिक
महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)
• नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) • व्हेंटिलेटरची सोय
• बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) • CPAP • Pulsoximeter
• दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) • वाफेची सोय (Nebulizer)
• बाल दमा निदान व उपचार • सेंट्रल ऑक्सिजनची सोय • 02 Concentrator
गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

## कृषी विद्यापीठांची निर्मिती शेतकरी हितासाठीच : डॉ.इंद्रामणी मिश्रा



करमाळा(सं.प्र.): शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये उन्नती व्हावी यासाठीच महाराष्ट्रामध्ये कृषी विद्यापीठांची निर्मिती शासनाने केलेली असून विद्यापीठाच्या चार भिंतीमध्ये बंदिस्त असलेल्या ज्ञानाची प्रत्यक्ष अंमलबजावणी पाणी फाउंडेशनच्या मार्गदर्शनानुसार करमाळा तालुक्यातील फार्मर कप स्पर्धेत सहभागी असणाऱ्या शेतकरी गटांनी केल्यामुळे करमाळा तालुक्यात यावर्षी निश्चितच तुरीचे उच्चांकी उत्पादन होईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात उन्नती येईल; असा विश्वास वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.इंद्रामणी मिश्रा यांनी केले.

सरपडोह येथे कृषी संशोधन केंद्र बदनापूर, आत्मा करमाळा व जिद्द शेतकरी गट, जिजाऊच्या लेकी शेतकरी गटाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर पाणी फाउंडेनचे सीईओ सत्यजित भटकळ, कृषी अधिकारी डी.एल.मोहिते, तालुका कृषी अधिकारी देवराव चव्हाण, कृषी संशोधन केंद्र बदनापूरचे डॉ.दिपक पाटील, वरीष्ठ शास्त्रज्ञ(पैदास्कर), डॉ.किरण जाधव, वरीष्ठ शास्त्रज्ञ डॉ.ज्ञानदेव मुटकुळे, डॉ.विष्णू गित्ते, डॉ.प्रशांत सोनटक्के, रोगशास्त्रज्ञ तसेच महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठाचे डॉ.नंदकुमार कुटे, डॉ.अनिल दुर्गुडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना कुलगुरू डॉ.मिश्रा म्हणाले, की पाणी फाउंडेशन केवळ सामाजिक बांधिलकीतून वॉटर कप, फार्मर कप या माध्यमातून काम करत आहेत. खरं तर विद्यापीठ आणि महाराष्ट्र शासन कृषी विभागाचे कामच पाणी फाउंडेशन पुढे घेऊन जात आहे. अतिशय आत्मियतेने आणि तळमळीने हे काम केले जात असल्यामुळे पाणी फाउंडेशनची चळवळ ही लोकचळवळ झाली आहे. त्यामुळेच एवढ्या मोठ्या संख्येने शेतकरी महिला शेतकरी या कार्यक्रमाला उपस्थित आहेत त्याबद्दल मी समाधानी आहे.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस फिसरे व सरपडोह येथील तुर पिकांच्या प्लॉटची पाहणी कुलगुरू व शास्त्रज्ञांनी केली. प्रास्ताविक पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक सत्यवान देशमुख यांनी केले. सुत्रसंचालन तालुका समन्वयक आशिष लाड यांनी केले तर उपस्थितांचे आभार कृषी विभाग आत्माचे अजयकुमार बागल यांनी मानले.

## झाडबुके इंग्लीश स्कुलमध्ये आनंद बाजार उपक्रम साजरा

करमाळा(सं.प्र.) : येथील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके इंग्लिश मेडियम प्रायमरी स्कुल मध्ये संस्थेच्या चेअरमन वर्षाताई ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद बाजारचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन बार्शी शाखेतील टेक्नीकल हायस्कुलचे शिक्षक अमोल बारकुल व जेष्ठ पालक नवनाथ सुरवसे यांचे हस्ते झाले. यावेळी उपस्थित सर्व पालकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या उपक्रमात सर्व विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने सहभागी होऊन फळे, पालेभाज्या, मिठाई इ. वस्तू विकण्यास आणल्या होत्या. सर्व पालकांनी चिमुकल्यांकडून वस्तू खरेदी करून त्यांचे कौतूक केले. विद्यार्थ्यांमध्ये पालेभाज्यांचे महत्व व त्यांची ओळख, संभाषण कौशल्य, व्यावहारिक ज्ञान, चलनांची ओळख इ. उद्दीष्टे साध्य करण्याचा प्रयत्न या उपक्रमाद्वारे करण्यात आला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक मंगेश भंडारे, शिक्षिका मेघा, ठोसर मॅडम, आहेर मॅडम, रणशूर मॅडम व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## माहेरावरून उसणे पैसे आणत नसल्यामुळे पत्नीस काठीने मारहाण - पत्नीचा मोडला हात

करमाळा : भावाचे लग्न करण्यासाठी माहेरावरून उसणे पैसे का आणत नाही म्हणून पतीने पत्नीस काठीने मारहाण केली. त्यात पत्नीचा हात मोडला आहे. हा प्रकार ७ डिसेंबरला सकाळी सात वाजता शेलगाव(वांगी) येथे घडला आहे. या प्रकरणी पत्नी ज्योती प्रभुशन दगडे यांनी पतीच्या विरूध्द फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझ्या दीराच्या लग्नासाठी माझ्या पती प्रभुशन गुंडिबा दगडे (रा.शेलगाव वांगी) यांनी माहेरावरून पैसे उसणे घेऊन ये.. अशी मागणी केली. त्यावेळी मी माझ्या माहेरी गरीबी असून ते उसणे पैसे देवू शकणार नाहीत.. असे म्हणाले. त्यावेळी तु उलटे बोलते काय.. असे म्हणून माझ्या पतीने अगोदर लाथाबुक्क्यांनी मारहाण करून नंतर काठीने मारहाण करून माझा हात मोडला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरद्वारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
fastrack
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
चिवटे उपहारगृह

| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर<br>उडीदवडा सांबर<br>उत्तप्पा<br>डोसा | पुरी भाजी<br>मिसळ पाव<br>पोहे/उपमा<br>दहीवडा/शिरा | पावभाजी<br>तवापुलाव<br>सँडविच<br>फिंगर चिप्स | पाणीपुरी<br>स्पे.भेळ<br>रगडा पॅटिस<br>राज कचोरी | पेढा, बर्फी<br>लाडू, जामून<br>म्हैसुरपाक<br>काजू कतली | फरसान<br>शेव<br>स्पे.चिवडा<br>पापडी |

डेअरी: दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी
साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.
एकवेळ अवश्य भेट द्या..!
राशिनपेठ, करमाळा. मो.८८८८१४७००५
कोल्ड्रींक: कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

# पांडे येथे गणेश चिवटे यांचे हस्ते विविध विकासकामांचे भुमीपूजन



करमाळा(सं.प्र.): पांडे येथे भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गणेश चिवटे यांचे माध्यमातून विविध विकासकामे मंजूर झाली होती. यामध्ये ग्रामपंचायत कार्यालय ते मस्जिद रस्ता सिमेंट काँक्रीटकरण करणे, ग्रामपंचायत कार्यालय ते सावतामाळी मंदिर रस्ता सिमेंट काँक्रीटीकरण करणे. या कामासाठी आठ लाख रूपये निधी मंजूर झाला होता. सदर विकासकामाचे उद्घाटन गणेश चिवटे यांचे हस्ते झाले.

यावेळी बोलताना चिवटे म्हणाले, की पालकमंत्री चंद्रकांत पाटील व माजी खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या माध्यमातून आपण करमाळा तालुक्याच्या विकासकामासाठी अनेक गावांमध्ये विविध विकासकामांना निधी मंजूर केला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून पांडे गावास २५ ते ३० लाख रूपये निधी मंजूर केला आहे. यापैकी दोन कामांचे भुमीपूजन झाले. यापुढेही पांडे गावासाठी व तालुक्याच्या विकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न आपण करणार असल्याचेही चिवटे यांनी सांगितले.यावेळी बिटरगावचे सरपंच डॉ.अभिजीत मुरूमकर, भाजपा तालुका उपाध्यक्ष बंडू शिंदे, सरचिटणीस नितीन झिंजाडे यांचेसह पांडेचे सरपंच बाळासाहेब अनारसे, ग्रा.पं.सदस्य संदिपान दुधे, शिवाजी भोसले, कल्याण दुधे, दशरथ कुंभार, इन्नुस मुजावर, पप्पू अनारसे, माजी उपसरपंच गहिणीनाथ दुधे, गजेंद्र वीर गुरूजी, उपसरपंच नितीन निकम, नाना अनारसे , अजित दुधे, रघुनाथ दुधे, सतीश अनारसे, सिकंदर तांबोळी, राजेंद्र गोसावी, प्रल्हाद मेंढापूरे, अंकुश वीटकर, मुरलीधर क्षीरसागर तसेच पत्रकार बांधव उपस्थित होते.

**मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस**
व
**सर्व सेवा केंद्र**
**मस्कर ट्रेडिंग कंपनी**
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर,
प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

# निमगाव ह येथील सरपंच लखन जगताप यांचे सदस्य पद रद्द

करमाळा(सं.प्र.): निमगाव ह येथील विद्यमान सरपंच लखन अरूण जगताप यांचे पद जिल्हाधिकारी यांचेकडून रद्द करण्यात आले आहे.

निमगाव ह येथील ग्रामपंचायत निवडणूक सन १९/२०२० मध्ये झालेली होती. त्यामध्ये मकाई कारखान्याचे संचालक सतीश नीळ यांची पार्टी बहुमताने विजयी झालेली होती. परंतु लखन जगताप यांनी बागल गट सोडून सरपंच पद मिळविले होते. त्यानंतर सतीश नीळ यांनी लखन जगताप यांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे त्यांना पदावरून दूर करावे; अशी लेखी तक्रार जिल्हाधिकारी यांचेकडे केली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी लखन जगताप यांचे सदस्य पद रद्द केले आहे. सतीश नीळ यांचे वतीने ॲड.घोडके तर जगताप यांचे वतीने ॲड.मराठे यांनी काम पाहिले.

# हिवरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी अतुल फरतडे बिनविरोध

करमाळा(सं.प्र.) : हिवरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी अतुल आजिनाथ फरतडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. निवडीनंतर अतुल फरतडे यांनी हिवरे गावातील विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपण सदैव प्रयत्नशील राहू; असे आश्वासन दिले. यावेळी सरपंच सुनिता माळी, माजी उपसरपंच शिवाजी खाडे, ग्रामपंचायत सदस्या मैना फरतडे, ग्रामसेवक कैलास धारेकर यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

**संस्कार सिटी** फेज २
धर्मसंगीत लॉन्स शेजारी, करमाळा-कर्जत रोड
किंमत
3,51,000.00/-
1000 स्क्वे.फुट पासून
आजच साईट व्हीजीट करा
४ एकरचा भव्य टाऊनशिप प्रकल्प
प्लॉट्स बुकींग सुरू आहे
त्वरा करा..,
मोजकेच प्लॉट शिल्लक
वैशिष्टे
• सुरूवातीला २१ प्लॉट बुकींग करणाऱ्यांस टूनवाल कंपनीची इलेक्ट्रीक स्कुटर फ्री
• अतिशय वाजवी दरामध्ये संपूर्ण वास्तुशास्त्रानूसार ७५० ते १५०० स्क्वे.फुट प्लॉट्स उपलब्ध
• क्लिअर टायटल एन.ए.प्लॉट्स । स्वतंत्र सातबारा उतारा
• प्रशस्त अंतर्गत ३० व ४० फुटी रस्ते
• अद्ययावत अंडरग्राउंड ड्रेनेज लाईन
• स्ट्रीट लाईट्स व भव्य आकर्षक प्रवेशद्वार
• रस्त्याच्या दुतर्फी हिरवीगार झाडी
• गार्डन सभोवताली कंपाऊंड व झाडी




बुकींगसाठी संपर्क
आतार डेव्हलपर्स
फंडगल्ली, करमाळा., जि.सोलापूर
आतार कलेक्शन & फुटवेअर
फंडगल्ली, करमाळा., जि.सोलापूर
जावेद आतार (9423334210)/मुन्नाभाई काझी (9881089582)

# मुळव्याध शिबीर ! मुळव्याध शिबीर ! मुळव्याध शिबीर

## आई कमला भवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्था, करमाळा.



## जाधव-पाटील हॉस्पिटल

करमाळा व महाराष्ट्रातील प्रसिध्द मुळव्याध तज्ञ



### डॉ.प्रदिप तुपेरे

एम.बी.बी.एस.,एम.एस.(जन.सर्जन)

यांच्या संयुक्त विद्यमाने

### सवलतीच्या दरात उपचार शिबीर

**मुळव्याध (पाईल्स)वर इंजेक्शन (स्क्लेरोथेरपी), लेझर ट्रिटमेंट**

**रुग्णांना ही लक्षणे असल्यास शिबीराचा लाभ घ्यावा**

- शौचमार्गास दाह,जळजळ होणे
- शौचमार्गास खाज येणे
- गुदध्दाराभोवती आग होणे
- कोंब बाहेर येणे
- शौचातून रक्त येणे
- चिर पडणे

**इंजेक्शनचे विशेष गुणधर्म**

- मुळव्याधीच्या कोंबाना रक्त पुरवठा करणाऱ्या रक्तवाहीन्याभोवती विशिष्ट इंजेक्शन देवून रक्त पुरवठा गोठविण्यात येतो
- मुळव्याधीवर अत्याधुनिक उपचारत पध्दती, ऑपरेशनची गरज नाही
- ॲडमिट होण्याची गरज नाही
- मुळव्याधीच्या पहिल्या व दुसऱ्या अवस्थेतील रुग्णांकरिता अतिशय उपयुक्त उपचार पध्दती
- खाण्याचे विशेष पथ्य नाही

**मुळव्याध इंजेक्शन/लेझरसाठी पाळावयाच्या सुचना**

- इंजेक्शन घेण्यासाठी ५ तास उपाशी पोटी यावे.(सकाळी ६ नंतर खाऊ-पिऊ नये)
- डायबेटीस व ब्लडप्रेशर असल्यास सकाळचा डोस घ्यावा.
- इंजेक्शन मुळव्याधीच्या ठिकाणी दिले जाते
- हाताच्या शिरेतून भुलतज्ञांमार्फत भुल दिली जाते
- सोबत टॉवेल किंवा लूंगी आठवणीणे घेवून येणे

**रविवार**
**दि.२२/१२/२०२४**
**सकाळी-८ ते ३ वा.**

**सकाळी ८ ते १० वेळेत हॉस्पिटलला हजर राहणे**

**शिबीराचे स्थळ:-**

कै.डॉ.प्रदिपकुमार (आबा) जाधव-पाटील
"सहवास जरी सुटला तरी स्मृती कायम सुगंध देत राहील"

## जाधव-पाटील हॉस्पिटल

**अर्बन बँक शेजारी,मेन रोड,करमाळा.**

**डॉ.रोहन प्रदिप पाटील**
M.B.B.S. (M.D.Physician)
FCPS Medicine

**डॉ.सौ.शिवानी रोहन पाटील**
M.B.B.S.,M.D.Pathology

(नाव नोंदणी आवश्यक) **शिबीरासाठी नाव नोंदणी संपर्क - Ph.(02182)299 611**
**Mo.7559214551 / 9322945948 / 7776999034 / 7507314133**


लग्न बस्त्याचे
विश्वसनीय वस्त्रदालन..
भावेश
कलेक्शन
प्रोप्रा : भावेश नवले
मो.9960080750, 7756066330
नवीन फ्रेश स्टॉकमध्ये
५ साड्यांच्या खरेदीवर
त्याच किंमतीची १ साडी फ्री..
लग्न बस्त्यावर
विशेष सुट
फॅशन डिझायनर साड्या
किड्स ड्रेस - थ्री पीस व शेरवानी ड्रेस
कटपीस - शर्ट व पॅन्ट (रेमंड, सियाराम कंपनीचे)
वुलन ड्रेस - जॅकेट, स्वेटर, हुडी
एकवेळ अवश्य भेट द्या..!
पत्ता : गायकवाड चौक, कॉलेज रोड, महेंद्रनगर, करमाळा., जि.सोलापूर.


करमाळा विधानसभा निवडणुकीत
मा.श्री.नारायण(आबा) पाटील
प्रचंड मताधिक्याने विजयी होऊन पुनश्च:
आमदार पदी निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
चेअरमन, वि.का.सो.
व्हा.चेअरमन, झरे सोसा.
माजी व्हा.चेअरमन
ग्रा.पं.सदस्य
ग्रा.पं.सदस्या
ग्रा.पं.सदस्या
सदस्या, झरे सोसा.
सदस्य, झरे सोसा.
सदस्य, झरे सोसा.
सदस्य, झरे सोसा.
सदस्य, झरे सोसा.
सौ.लक्ष्मी आमृळे
राजेंद्र मावलकर
अर्जुन गायकवाड
प्रशांत चौधरी
सौ.राधाबाई बोराटे
सौ.सोनाली कोकाटे
सौ.कमल कांबळे
अशोक गुंजाळ
अकबर मुलाणी
महादेव घाडगे
भानुदास बोराटे
सदस्य, झरे सोसा.
सदस्य, झरे सोसा.
सदस्य, झरे सोसा.
सदस्य, झरे सोसा.
सदस्य, झरे सोसा.
पांडूरंग मावलकर
अशोक सराटे
महादेव काळे
दत्तू चौधरी
कैलास कोठावळे
शुभेच्छुक
विकास(दादा)आमृळे मित्र परिवार
व समस्त ग्रामस्थ, झरे ता.करमाळा